# प्रकरण 7 (नियमावली 6)

## मंडळे, सल्लागार मंडळ, समित्या आणि इतर समित्या स्थापन करणे व त्यांचा सहभाग

माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या दि.09.12.2003 व दि. 30.7.2004 रोजीच्या आदेशानुसार फेरीवाला विभाग व विना फेरीवाला विभाग योजनेच्या अंमलबजावणीसाठी अनुक्रमे शहर विभाग, पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरे यांजकरिता तीन त्रिसदस्य समिती स्थापन करण्यात आल्या होत्या. फेरीवाला विभाग निश्चित करणे, फेरीवाल्यांच्या सूचना / हरकतींवर सुनावणी देणे तसेच अनुज्ञापन खात्यास सदर योजनेसंदर्भात प्रशासनास मार्गदर्शन करणे यासारखी कामे सदर समितीद्वारे पार पाडण्यात येत होती.

तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 30.11.2010 रोजी उपरनिर्दिष्ट तीनही समिती विसर्जित करुन महानगरपालिका आयुक्तांना फेरीवाला धोरण आणि तद्नुषंगिक कामकाजास्तव जबाबदार अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिका आयुक्तांनी क्र.एमजीसी/एफ/4765 अन्वये दि.30.04.2011 रोजी उप आयुक्त (फेरीवाल्यांचे नियमन) यांची नियुक्ती केलेली आहे. सदर नियुक्ती फेरीवाला उपविधी अंमलात येईपर्यंच्या कालावधीपर्यत प्रभावी राहील. अधिकृत व अनअधिकृत फेरीवाल्यांचे नियमन करणे तसेच याबाबत धोरण आखणे व निर्णय घेणे हे उप आयुक्त (फेरीवाल्यांचे नियमन) यांचे मुख्य कर्तव्य आहे.

.

**सही/-**
**अनुज्ञापन अधीक्षक**